**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २९ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भारताच्या समुद्री सामर्थ्यावर जगभरातल्या देशांचा विश्वास असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **नागपुरातील महाएल्गार आंदोलनामुळे वाहतूक ठप्प /आंदोलन स्थळ आज ६ वाजेपर्यंत रिकामे करण्याचे नागपूर खंडपीठाचे निर्देश.**
3. **राज्यात सोयाबीन खरेदी १५ नोव्हेंबरपासून होणार पणनमंत्री जयकुमार रावल यांची घोषणा.**
4. **केंद्र सरकारप्रमाणे महाराष्ट्राचे 'स्टेट मन्युफॅक्चरिंग मिशन' सुरू करणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती.**
5. **यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयात आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट.**

-------------------------------------------

मोदी मेरीटाईम

भारताच्या समुद्री सामर्थ्यावर जगभरातल्या देशांचा विश्वास असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. मुंबई मध्ये मेरीटाईम लीडर्स कॉन्क्लेव्हला संबोधित करताना ते बोलत होते. जगभरातील 80% देशांच्या प्रतिनिधींची उपस्थिती या गोष्टीला दुजोरा देते असेही ते म्हणाले. 2025 हे वर्ष भारतासाठी विशेष महत्त्वाचे असल्याचं सांगून याच वर्षी वीजहीनजम डीप वॉटर बंदर पूर्णपणे सक्रिय झाल्याची माहिती त्यांनी दिली. काही दिवसांपूर्वी जगातले सगळ्यात मोठे कंटेनर वेसेल त्या ठिकाणी पोहोचणे ही सर्व भारतीयांसाठी अभिमानाची बाब होती असेही त्यांनी सांगितलं. वर्ष 2024-25 मध्ये भारतातील बंदरांनी सर्वाधिक कार्गो समन्वयनात भाग घेतल्याने बंदरांचं महत्त्व अधोरेखित झाल्याचं ते म्हणाले. तत्पूर्वी समुद्री मार्गाने होणारा व्यापार अधिक सुगम कशा प्रकारे करता येईल याविषयी आयोजित प्रदर्शनीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेसको सेंटर इथं भेट दिली.

-------------------------------------------

बच्चू कडू/फडणवीस

शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सरकार पहिल्या दिवसापासून सकारात्मक आहे, बच्चू कडूंनी चर्चेसाठी मुंबईत यावं अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी आज मांडली. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती,शेतमालाला हमीभाव, दिव्यांगांना ६ हजार रुपये मानधन, यांसह २० प्रमुख मागण्यांसाठी कालपासून नागपुरात प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वात महाएल्गार आंदोलन सुरु आहे, त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री बोलत होते -

***(होल्ड बाईट - फडणवीस २० सेकंद)***

***सरकारने पहिल्या दिवशी पासनं सकारात्मक भूमिका ठेवलेली आहे. आजही बावनकुळे साहेबांनी त्यांच्याशी संपर्क केलेला आहे. त्यांनी इतके वेगवेगळे प्रश्न मांडलेले आहेत, ते प्रश्न असे नुसते आंदोलनाच्या माध्यमातून त्या ठिकाणी सोडूवू शकतो, अशी परिस्थिती नाही आहे त्याच्यावर चर्चा करून त्याचा रोडमॅप तयार करावा लागेल. त्यामुळे त्यांना चर्चेचं निमंत्रण देखील आम्ही दिलेला आहे.***

दरम्यान, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बच्चू कडू यांना चर्चेतून मार्ग काढण्यासाठी मुंबईला येण्याचे दिलेले निमंत्रण कडू यांनी नाकारलं असून, सरकारनं नागपुरात येऊन आंदोलकांशी संवाद साधावा असं कडू यांनी म्हटलं आहे. आज महाराष्ट्रातला शेतकरी हवालदिल झाला आहे आणि त्याचा सातबारा कोरा झाला पाहिजे असं, त्यासाठी हे आंदोलन करत असल्याचं कडू यांनी म्हटलं आहे -

***(होल्ड बाईट - बच्चू कडू - १८ सेकंद)***

***हमीभावानेंच खरेदी सुरू केल्याने अजूनही सोयाबीनची खरेदी नाही ,कापसाची नाही, मक्याची नाही काहीच नाही आणि जो माल विकला त्याला कोण पैसे देणार आहे सगळ्यात जास्त अडचणीत महाराष्ट्रातला शेतकरी आहे सगळ्यात घाटात आम्ही पाहतो आमचा शेती मल विकावा लागतो. इतर राज्याच्या तुलनेत आम्ही 40 टक्के घाट्याने आम्ही आमचा माल विकत आहोत.***

बच्चू कडू आणि समर्थक वर्धा-नागपूर महामार्गावरील जामठा परिसरातील कापूस संशोधन केंद्राच्या ३० एकर मैदानात ठिय्या देऊन आहेत. या आंदोलनामुळे वर्धा, चंद्रपूर, आणि हैदराबाद महामार्गांवरील वाहतूक कालपासून ठप्प झाली असून लांबच लांब रांगा जामठा परिसरात पाहायला मिळत आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याची स्वतःच दाखल घेत आंदोलकांना आंदोलन स्थळ आज ६ वाजेपर्यंत रिकामे करण्याचे निर्देश दिले आहेत. महाएल्गार आंदोलनाला २४ तासाची मुदत देण्यात आली होती ती उलटून

गेल्याने हे निर्देश देण्यात आले आहे. दरम्यान आज दुपारी प्रहार संघटनेच्या काही कार्यकर्त्यांनी नागपूर मुंबई रेल्वे मार्ग प्रभावित करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलीस आणि आरपीएफ च्या जवानांनी वेळीच परिस्थिती नियंत्रणात आणली.

-------------------------------------------

सोयाबीन खरेदी

यंदाच्या खरीप हंगामातील सोयाबीन, उडीद आणि मूग खरेदीसाठी आजपासून शेतकऱ्यांची नोंदणी सुरू होत असून प्रत्यक्ष खरेदी १५ नोव्हेंबरपासून सुरू होईल, अशी माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली. शेतकरी ॲप किंवा पोर्टलवर नोंदणी करू शकतील आणि गर्दी टाळण्यासाठी नोंदणीच्या वेळी, वेळ आणि तारीख नमूद करण्याची सोय उपलब्ध आहे. बारदाना खरेदीची प्रक्रिया सुरू असून तुटवडा भासू नये यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी होऊ नये म्हणून तक्रार निवारण कक्ष व दक्षता पथके जिल्हा आणि तालुका स्तरावर स्थापन करण्यात आली आहेत. तसेच कपास किसान ॲपद्वारे कापूस खरेदीसाठी आतापर्यंत ३.७५ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून खरेदी केंद्रांची संख्या १२४ वरून १७० पर्यंत वाढविण्यात आली आहे.

-------------------------------------------

जीएसटी

केंद्र सरकार तर्फे करण्यात आलेल्या जीएसटी सुधारणांमुळे एकंदरच सामान्य लोकांची विविध बाबतीत बचत होत असून अनेक वस्तूंवरील कर कमी झाल्याने त्याच्या किमती आपोआपच कमी झाल्या आहे. याबद्दल आपलं मनोगत व्यक्त केला आहे ॲडव्होकेट घापेश ढवळे यांनी-

***(होल्ड बाईट -३४ सेकंद)***

***केंद्र सरकारने जीएसटी दरामध्ये जो बदल केला आहे आणि जीएसटी कमी केली, त्यामुळे सणासुदीच्या दिवसात किंवा अशा विविध वेळेत सुद्धा लोकांना त्याचा खूप फायदा होत आहे. गाड्यांच्या किमती कमी झाल्या किंवा रोज वापराच्या बऱ्याच वस्तूंच्या किंमती कमी झाल्यामुळे आज जीएसटीचा फायदा संपूर्ण भारतातील लोकांना होत आहे आणि त्यामुळे आज लोकांच्या ज्या काही अपेक्षा होत्या त्या आता अपेक्षा पूर्ण होत आहेत आणि त्या या नवीन***

***जीएसटी दरामुळे लोकांना त्याचा विविध क्षेत्रात किंवा विविध वस्तू खरेदी करण्यात खूप फायदा होते.***

-------------------------------------------

एस टी

यंदाच्या दिवाळी हंगामात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळानं तब्बल ३०१ कोटींचं विक्रमी उत्पन्न मिळवलं आहे. दिवाळी सुटीच्या परतीच्या दिवशी म्हणजेच २७ ऑक्टोबरला ३९ पूर्णांक ७५ कोटींचे सर्वाधिक दैनिक उत्पन्न नोंदवले गेले. उत्कृष्ट कामगिरीबद्दल परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळ अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं अभिनंदन केलं आहे.

-------------------------------------------

प्रकाशन फडणवीस

नीती आयोगाच्या ‘रोड टू इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६’ परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात ‘राज्य उत्पादन अभियान’ सुरू करण्याची घोषणा केली. केंद्राच्या राष्ट्रीय उत्पादन अभियानाशी संलग्न राहून राज्य सरकार हे अभियान राबवणार आहे. यावेळी त्यांनी पुणे-मुंबईदरम्यान ‘ग्लोबल फ्रंटियर टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट’ स्थापन करण्याचाही मनोदय व्यक्त केला. त्यांनी सांगितले की महाराष्ट्र प्रगत उत्पादन क्षेत्राचे नेतृत्व करेल आणि ॲडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंगद्वारे जागतिक स्पर्धेत आपले स्थान मजबूत करेल. राज्यात ‘इज ऑफ डुइंग बिझनेस’ अंतर्गत १०० सुधारणा राबविल्या जात असून महाराष्ट्राला उत्पादन आणि डेटा क्षेत्राचे केंद्र बनविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

-------------------------------------------

जनार्दनस्वामी योगा

जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दिनांक ७ ते ९ नोव्हेंबर २०२५ दरम्यान नागपुरात रामनगर इथं त्रिदिवसीय आंतरराष्ट्रीय योग संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. संमेलनाचं उद्घाटन ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११:३० वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे देखील प्रामुख्यानं उपस्थित राहणार आहेत. या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष राम खांडवे गुरुजी लिखित *“अनुभवसिद्ध योगोपचार”* या ग्रंथाच्या हिंदी आणि इंग्रजी

आवृत्त्यांचे प्रकाशन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होईल. या संमेलनांत सहभागी होण्याचं आवाहन अध्यक्ष राम खांडवे गुरुजी यांनी केलं आहे_

***(होल्ड बाईट - २२ सेकंद)***

***आगळावेगळा योग सम्मेलनाचा हा कार्यक्रम होत आहे. याला सगळ्यांनी उपस्थित राहावं. त्यादृष्टीन जो संपर्क तो आपल्याला सांगण्याची येईल आपलं जीवन सुखी, समाधानी आणि निरोगी करण्याचा मार्ग चोखाळावा अशी सर्व जनतेला मनपूर्वक करबध्द प्रार्थना आहे.***

------------------------------------------

राष्ट्रीय एकता दिवस

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त अकोला जिल्ह्यात राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ३१ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान पदयात्रा, रक्तदान, निबंध स्पर्धा, स्वच्छता मोहिम आदी उपक्रम राबविण्याचं निश्चित करण्यात आलं आहे. ११ नोव्हेंबर रोजी वसंत देसाई क्रीडांगणापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत भव्य पदयात्रा देखील आयोजित केली जाणार आहे.

------------------------------------------

क्रिकेट

कॅनबेरा इथं भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला टी-२० सामना मुसळधार पावसामुळे रद्द करण्यात आला. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर भारताने ९.४ षटकांत एका विकेटच्या मोबदल्यात ९७ धावा केल्या होत्या. शुभमन गिल आणि सूर्यकुमार यादव यांनी नाबाद अर्धशतकी भागीदारी केली, मात्र सततच्या पावसामुळे सामना पुढे खेळवता आला नाही.

------------------------------------------

गृहनिर्माण सोडत

म्हाडा पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पी एम आर डी ए सह सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातल्या विविध गृहनिर्माण योजनेतल्या ४ हजार १८६ सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित संगणकीय सोडतीसाठी अर्ज सादर करण्यासाठी २० नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ

देण्यात आली आहे. अर्जदारांच्या सोयीसाठी याबाबतची सविस्तर माहिती म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

-------------------------------------------

हवामान

यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय वाशिम, वर्धा आणि नागपूर मध्ये देखील मुसळधार पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. त्याचप्रमाणे बुलढाणा, अकोला, अमरावती भंडारा आणि गोंदिया या ठिकाणी वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या वाशिम आणि यवतमाळ जिल्हा वगळता सर्वत्र वादळी पर्जन्यमान राहू शकतं. या दरम्यान भंडारा इथं मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

-------------------------------------------